**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.३/२०१७**
**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१**
**निशाणी क्र.४१ पुढे सुरु**

**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास वादी यांचेतर्फे विधीज्ञ श्रीमती. एस. एल. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

१५. हे म्हणणे खरे आहे की, माझा चुलत भाउ आरीफ उर्फ इरफान यांनी रे. दि. अ. नंबर १६३३/९९/२००९ हे अपिल भूमी अभिलेख कार्यालय येथे दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मला व वादी यांस जाब देणार म्हणून सामील केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या अपिलात लेखी जबाब व युक्तीवाद दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १२/१२/२००८ रोजीच्या अपिलाच्या रोजनाम्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हापासून वादी व माझे वडील नजीर मेहताबखान पठाण झालेल्या मोबदला पत्रकापासून सदरची वाद मिळकत वादीचे वडिलांचे नांवावर नोंद होवून त्याप्रमाणे सन १९७३ पासून वादी हे त्या जागेचा कर भरत आहे व ती जागा मालकी हक्काने वहिवाटीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपिल नंबर १६३३/९९/२००९ च्या आदेशावर नाराज होवून मी सातारा येथील जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांचे कडे अपिल क्रमांक १७८८/२०१५ हे दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते अपिल आम्ही पूर्तता न केलेमुळे काढून टाकले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाउ इरफान पठाण व एकनाथ खडसे यांचे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, एकनाथ खडसे यांनी पत्र पाठवुन मी व माझा भाउ इरफान पठाण यांनी अपिल क्रमांक १७८८/२०१५ ची तात्काळ सुनावणी घ्यावी असे कळविले. हे म्हणणे खरे नाही की, एकनाथ खडसे यांच्या शिफारशीवरुन जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांनी वादीला नोटीस न देता वादीचे परस्पर सदरचे अपिल निकाली केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपील क्रमांक १७८८/२०१५ चा एकतर्फा निकाल झाले नंतर आम्ही वादीला वहिवाटीला हरकती करु लागलो. हे म्हणणे खरे नाही की, वादीने मोजणी मागविलेनंतर आमची सही मागितली असता

आम्ही सही देणेस नकार दिला व आम्ही मोजणी करु दिली नाही. आता मी ज्या घरात राहतो त्याचा सिटी सर्वे नंबर ११७२ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आता मी ज्या घरात राहतो ती मिळकत मूळची वादीचे वडिल महंमद हसन आगा यांचे मालकीची होती. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या त्या जुन्या घरात दुरुस्ती करुन आम्ही राहत आहोत. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८/०३/१९७३ रोजी वादीचे जुन्या घराची दुरुस्ती करुन माझे वडिलांनी घर बांधलेमुळे दिनांक १६/०३/१९७३ रोजी वाद मिळकतीचे मोबदला पत्रक वादी यांना करुन दिले होते त्यावर माझे वडिलांच्या सहया आहेत हे म्हणणे खरे नाही. आता मला सरतपासातील परिच्छेद क्रमांक ०१ ते ११ मधील मजकूर वाचून दाखविणेत आला. हे म्हणणे खरे नाही की, सदर मजकूर हा मी खोटा लिहलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा सरतपास हा माझे सांगणेप्रमाणे केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यातील मजकूर हा माझे सांगणेप्रमाणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर हा वकिलांनी तयार केलेला आहे व त्यातील मजकूर मला माहित नाही व तो मजकूर खोटा व लबाडीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो वकिलांनी तयार केलेला आहे व त्यावर मी फक्त सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरची जागा फुकटात मिळवणेसाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

स. वा. पू. के.

श्रवणोत्तर स्वीकृत

**ठिकाण** : मेढा

**दिनांक** : ०६.०१.२०२५

रविंद्र भ. खवले,

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.**